आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३० डिसेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातल्या परकीय चलन साठ्यात ७०० अब्ज अमेरिकन डॉलर्सची वाढ
- चालू महिन्यात आतापर्यंत भारतीय भांडवली बाजारात २२ हजार कोटींहून अधिक रुपयांची परदेशी गुंतवणूक
- अंतराळात झेपावलेले उपग्रह कक्षेतच एकमेकांना जोडण्याच्या प्रयोगासाठी इसरो सज्ज
- डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित तीन दिवसीय राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनाची सांगता
- सोमवती अमावस्येनिमित्त राज्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन

**आणि**

- बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट स्पर्धेच्या चौथ्या सामन्यात भारताचा १८४ धावांनी पराभव

**<><><><><>**

देशातल्या परकीय चलन साठ्यात ७०० अब्ज अमेरिकन डॉलर्सची वाढ झाली आहे. त्यामुळे भारत जगात चौथ्या स्थानी पोहचला आहे. २०१४ ते २०२४ या दशकात एकूण थेट परकीय गुंतवणूक अंदाजे सातशे नऊ अब्ज डॉलर्स पेक्षा जास्त आहे. जागतिक स्पर्धात्मकता निर्देशांकात भारत २०१४ साली ७१व्या स्थानी होता, २०१८ साली भारत ३९ व्या स्थानी पोहचला आहे. लॉजिस्टिक्स, नवोन्मेष, सुरक्षा तसंच सायबर सुरक्षा अशा क्षेत्रांमध्ये

देशानं लक्षणीय प्रगती केली आहे. २०१५ ते २०१८ दरम्यान व्यवसाय सुलभता निर्देशांकात ४२ क्रमांकावर झेप घेतली असून भारत गुंतवणुकीसाठी एक प्रमुख केंद्र बनला आहे. २०२४ मध्ये, भारत चीननंतर जगातला दुसऱ्या क्रमांकाचा कच्च्या स्टीलचा उत्पादक देश आहे. मोबाईल फोन उत्पादनातही देशानं दुसरं स्थान मिळवलं आहे. जागतिक शैक्षणिक क्रमवारीत देशानं लक्षणीय प्रगती केली असून यावर्षीच्या क्यूएस जागतिक आशिया विद्यापीठ क्रमवारीत भारताच्या सात संस्थांनी पहिल्या १०० मध्ये स्थान मिळवलं आहे.

**<><><><><>**

विदेशी गुंतवणूकदारांनी डिसेंबरमध्ये आतापर्यंत भारतीय भांडवली बाजारात २२ हजार कोटींहून अधिक रुपयांची गुंतवणूक केली आहे. डिपॉझिटरीजच्या आकडेवारीनुसार, विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात १६ हजार ६७५ कोटी रुपये आणि पत पुरवठा बाजारामध्ये ५ हजार ३५२ कोटी रुपये गुंतवले, त्यामुळं भारतीय भांडवली बाजारात एकंदर निव्वळ गुंतवणूक २२ हजार ०२७ कोटी रुपये झाली. परदेशी गुंतवणूकदारांनी नोव्हेंबरमध्ये भांडवली बाजारामधून २१ हजार ६१२ कोटी रुपये आणि ऑक्टोबरमध्ये ९४ हजार १७ कोटी रुपये काढून घेतले होते. विशेष म्हणजे, सप्टेंबरमध्ये ५७ हजार ७२४ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह भांडवली बाजारातील एफपीआयचा ओघ नऊ महिन्यातील उच्चांकी होता.

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था - इस्त्रो आज रात्री श्रीहरिकोटा इथून दोन उपग्रह प्रक्षेपित करणार आहे. इस्त्रोचा अग्निबाण, 476 किलोमीटरच्या वर्तुळाकार कक्षेत एस डी एक्स 01 आणि एस डी एक्स 02 या दोन उपग्रहांना स्थापित करेल. त्यानंतर अंतराळातच हे उपग्रह जोडण्याचा प्रयोग करण्यात येणार आहे. ही कामगिरी करणारा भारत हा जगातला चौथा देश ठरेल. केवळ अमेरिका, रशिया आणि चीन या देशांनीच आत्तापर्यंत स्पेस डॉकिंग तंत्रज्ञानात प्राविण्य मिळवले आहे.

ही मोहीम यशस्वी झाल्यास भारतीय अंतराळ संशोधन क्षेत्र आघाडी घेईल.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज दिल्लीत व्यापार आणि उद्योग जगताच्या प्रतिनिधींशी अर्थसंकल्पपूर्व बैठक झाली. या बैठकीला वित्त, गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभाग, उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग आणि केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार यासह अनेक विभागांचे सचिव उपस्थित होते. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी संसदेत सादर होण्याची अपेक्षा आहे. अर्थमंत्री सीतारामन यांचा हा सलग आठवा अर्थसंकल्प असेल.

**<><><><><>**

राष्ट्रीय छात्रसेनेच्या प्रजासत्ताक दिन संचलन शिबिराला आज नवी दिल्लीच्या करिअप्पा मैदानावर सर्वधर्म पूजनाने प्रारंभ झाला. २८ राज्य आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमधून आलेले २ हजार ३६१ छात्रसैनिक महिनाभर चालणाऱ्या या शिबिरात सहभागी होत आहेत. त्यात ९१७ विद्यार्थिनींचा समावेश आहे. जम्मू काश्मीर आणि लडाखमधून ११४ छात्रसैनिक शिबिरात आले आहेत. तर ईशान्येकडच्या राज्यांचं प्रतिनिधित्व १७८ छात्रसैनिक करत आहेत. याखेरीज १४ मित्रदेशांमधले कॅडेट्स युवा आदानप्रदान कार्यक्रमाअंतर्गत सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त अकोल्यातले कृषि विद्यापीठ, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आणि महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनाची काल संध्याकाळी सांगता झाली. माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांचं दुःखद निधन झालं असल्यामुळं केवळ स्टॉल धारकांना प्रमाणपत्र वितरित करून या प्रदर्शनाचा समारोप करण्यात आला. या प्रदर्शनाला शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. राज्यातल्या सुमारे साडेआठ लाख शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला.

**<><><><><>**

राज्यात खरीप हंगामात झालेल्या चांगल्या पावसामुळे धरणांमध्ये मुबलक पाणी साठा आहे. राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात वनराई बंधारे बांधण्याचं उद्दिष्ट कृषी विभागाने निश्चित केलं असून, त्याच्या अंमलबजावणीला सुरुवातही झाली आहे. राज्यात २०२४-२५ या वर्षात ५० हजार वनराई बंधारे बांधण्याचं उद्दिष्ट कृषी विभागानं केलं आहे. त्यापैकी सद्यस्थितीत १४ हजार १०९ वनराई बंधारे बांधून तयार झाले आहेत. या बंधाऱ्याद्वारे सुमारे एक लाख हेक्टरवरची रब्बी पिके, भाजीपाला, फळबागा, फुलशेतीला पाणी उपलब्ध होणार आहे. तसंच भूगर्भातली पाणीपातळी वाढण्यासही मदत होईल, असं कृषी आयुक्तालयानं म्हटलं आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागात ८६५, लातूर १ हजार २५३, कोकण - ९६३, नाशिक - १ हजार १३४, पुणे १ हजार ८७२, कोल्हापूर १ हजार पाच, अमरावती ३ हजार ५६६, तर नागपूर विभागातन २ हजार ४५० वनराई बंधारे तयार झाले आहेत.

**<><><><><>**

आज सोमवती अमावस्या. या निमित्ताने जेजुरी इथं खंडोबा देवाची सोमवती यात्रा आज होत आहे. दुपारी श्री खंडोबा देवाच्या पालखी सोहळ्याचं गडावरून प्रस्थान होईल. या यात्रेसाठी भाविक मोठ्या संख्येनं दाखल झाले आहेत.

**<><><><><>**

लातूर जिल्ह्यात वेळा अमावस्येचा सण आज मोठ्या उत्साहात साजरा झाला. या वर्षी पाऊस चांगला झाल्यामुळं आजची अमावस्या शेतकऱ्यांसह सर्वच जणांनी मोठ्या हर्षोल्हासात साजरी केली. या प्रसंगी पिकांची, शेतातल्या धान्याची पूजा करून, विशिष्ट खाद्यपदार्थ बनवून मित्र-परिवारासोबत वनभोजनाचा आनंद आज लातूर जिल्ह्यातल्या नागरिकांनी घेतला.

वेळा अमावस्येचा सण लातूर जिल्हा, धाराशिव जिल्हा आणि सोलापूर-बीड जिल्ह्याच्या काही भागात तसंच महाराष्ट्र- कर्नाटक सीमा भागात साजरा केला जातो. या सणाला 'येळवस' असंही म्हणतात.

<><><><><>

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि खंडणीप्रकरणातल्या सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांची भेट घेणार असल्याचं केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटलं आहे. मस्साजोग इथं संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><><>

बॉर्डर-गावस्कर चषक क्रिकेट स्पर्धेच्या चौथ्या सामन्यात आज ऑस्ट्रेलियानं भारताचा १८४ धावांनी पराभव केला. दुसऱ्या डावात विजयासाठी ३४०

धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाचा डाव केवळ १५५ धावात आटोपला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियन संघानं आपल्या पहिल्या डावात ४७४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल भारतानं पहिल्या डावात ३६९ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव २३४ धावांमध्ये आटोपल्यानंतर सामना जिंकण्यासाठी भारतापुढे ३४० धावांचं आव्हान होतं. त्याचा पाठलाग करतांना भारताचा डाव केवळ १५५ धावात आटोपला. भारतातर्फे यशस्वी जैस्वालनं सर्वाधिक ८४ धावा केल्या. नितीश रेड्डीचं शतक आणि जसप्रित बुमराह नं घेतलेले ५ बळी महत्त्वाचे ठरले तरी भारताला सामाना जिंकता आला नाही. ५ सामन्यांच्या या मालिकेत ऑस्ट्रेलिया २ - १ नं आघाडीवर आहे.

**<><><><><>**

भारतीय हॉकी लिग स्पर्धेत आज रात्री सव्वाआठ वाजता युपी रुद्रास यांचा सामना वेदांता कलिंगा लान्सर बरोबर होणार आहे. रुरकेलाच्या बिरसा मुंडा स्टेडिअमवर हा सामना होणार आहे.

**<><><><><>**

वरिष्ठ स्तरावरच्या पुरुषांच्या हँडबॉल राष्ट्रीय चँपियन स्पर्धेत केरळनं चंडीगढचा ३४ - ३१ नं पराभव करत विजेतेपद पटकावले. हा सामना काल

केरळच्या चांगनासेरी मध्ये खेळवला गेला. केरळचा संघ पहिल्यांदाच  या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला होता.

**//<><><><><>//**